**<u>नि.दि.दावा क्र. ७/२०२२ मधील निशाणी क्रं. १८  खालील आदेश</u>**
**जनाबाई विरुध्द प्रभाताई**
**दि. ०५/०८/२०२३**

१. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता व ताब्याकरीता दाखल केला असुन प्र वा क्र.१ ते ३ यांनी कैफीयत दाखल न केल्यामुळे दिनांक १५ /०२/२०२३ रोजी विना कैफीयतचा आदेश पारीत झालेला आहे .सदर आदेश मागे घेवुन जबाब दाखल करण्यास परवानगी दयावी यासाठी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी सादर केला आहे . सदर अर्ज वादीने आव्हानीत केला आहे. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

२. अभिलेख पाहिले असता, स्पष्ट होते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना दाव्याचा समन्स प्राप्त होऊनही त्यांनी ९० दिवसाच्या आत त्यांचा जबाब दाखल केला नाही. दिनांक १७/०९/२०२२ रोजी नि.क्र.१३ नुसार त्यांचा जबाब दाखल करण्यास मुदतीचा अर्ज रु.३००/– खर्चासह मंजुर करण्यात आला होता. परंतु त्या नंतरही जबाब दाखल न केल्यामुळे दिनांक १५/०२/२०२३ रोजी विना कैफीयतचा आदेश पारीत करण्यात आला. नि.क्र.१३ नुसार शेवटची संधी दिल्यानंतर जवळपास १ वर्ष कालावधी पर्यंत त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही . सदर प्रतिवादी हयांनी ९० दिवसांच्या आंत कैफियत दाखल करणे अपेक्षीत होते. परंतु, सदर प्रतिवादी हयांना आवश्यक ती माहिती व दस्तऐवज मुदतीत प्राप्त झाले नसल्यामुळे कैफियत मुदतीत दाखल करता आली नसल्याचे कारण नमूद केले आहे, तसेच सदर प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत सादर केली आहे . अर्जामधे प्र.वा.क्र.१ हे वयोवृध्द असुन ती आजारी असते आणि प्र वा क्र .२ व ३ यांचे लग्न झालेले असल्यामुळे आवश्यक ते दस्तऐवज मिळण्यास विलंब झालेचे कारण नमुद केले आहे. अर्जात नमुद केलेले कारण रास्त जरी असले तरी सदर प्रतिवादी हयांना झालेला विलंब हा किरकोळ स्वरुपाचा नसल्याने तो दुर्लक्षित करण्यासारखा नाही . परंतु असे जरी असले तरी नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन करण्यासाठी जर सदर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखात दाखल करून घेतली नाही तर दाव्याचा निवाडा गुणदोषांवर झाला असे म्हणता येणार नाही . त्यामुळे, सदर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करणे न्यायोचित ठरणार आहे. तसेच वादी हयांना झालेल्या नाहक त्रासाबद्दल सदर प्रतिवादी हयांना कॉस्ट करणे देखील न्यायोचीत ठरणार आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींना रक्कम रुपये ५०० /– कॉस्ट म्हणून देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.08.05 16:56:29 +0530

दिनांक– ०५/०८/२०२३

(विष्णु. द. गिते)

सह दिवाणी न्यायालय क.स्तर,

बाळापूर

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Date of Decision | :- | 05/08/2023 |
| Order signed by P.O on | :- | 05/08/2023 |
| Order uploaded on | :- | 05/08/2023 |